# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी: ०२२ २२८१०३८०
ई मेल: ashok.mande@nic.in

क्र: इबांका-२०१९/प्र.क्र. १७/काम-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९ जून, २०२२.

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी इमारत, पाचवा मजला,
ई-ब्लॉक,सी-२२,बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**विषय:**- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार लाभार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी योजनेबाबत

**संदर्भ:** - १. आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. आरोग्य तपासणी योजना/२०२२/प्र.क्र.७/योजना-२/१०६१, दि.१०.०५.२०२२
२. आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.आरोग्य तपासणी योजना/२०२२/प्र.क्र.७/योजना-२/११२८, दि.१८.५.२०२२

महोदय,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या दि.१०.०५.२०२२ व दि.१८.०५.२०२२ रोजीच्या संदर्भाधीन पत्रान्वये मंडळाकडे नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार लाभार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी योजनेस मुदतवाढ देणे, योजनेचा लाभ अवलंबितांना (कुटुंबास) देणे तसेच लाभार्थ्यांच्या घरी जाऊन आरोग्य तपासणी करणेबाबतच्या प्रस्तावास शासन मान्यता देणेबाबत विनंती केली आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन मान्यतेनुसार मला आपणांस खालीलप्रमाणे कळविण्याचे निर्देश आहेत :-

१) कोवीड-१९ विषाणू प्रादुर्भाव पुन:श्च वाढत असल्याने मे.एचएलएल लाईफ केअर लि. या संस्थेस दि. २८.०६.२०२२ पासून पाच वर्षांची मुदतवाढ देण्यास तसेच मंडळामार्फत नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार लाभार्थ्यांच्या घरोघरी जाऊन आरोग्य तपासणी करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) सदर आरोग्य तपासणी योजनेचा लाभ नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार लाभार्थी व त्यांच्या कुटुंबामधील (अवलंबितांमधील) यथास्थिति पती/पत्नी आणि त्यांची दोन अविवाहित १० वर्षांवरील अपत्ये यांना अनुज्ञेय असेल.

आपला,

(अशोक मांडे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :-निवड नस्ती (कामगार-७)